# <u>प्रेसनोट</u>

चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस हवालदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

दि.१२/०१/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १६/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - २३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - अनिल निवृत्ती होळकर, वय-५२<br>पद - पोलीस हवालदार,नेमणूक -चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- (दोन हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ११/०१/२०२२.
ठिकाण :- शिवराणा पोलीस चौकीजवळ, खराडी.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी एका महिलेला उसने दिलेले ५० हजार रूपये तक्रारदार यांना परत मिळवून देण्यासाठी व त्या महिलेची कोणतीही तक्रार न घेणेसाठी आरोपी लोकसेवक याने ५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी एका महिलेला उसने दिलेले ५० हजार रूपये तक्रारदार यांना परत मिळवून देण्यासाठी व त्या महिलेची कोणतीही तक्रार न घेणेसाठी आरोपी लोकसेवक यानी तक्रारदार यांचेकडे ५ हजार रूपये लाचेची मागणी करून २ हजार रूपये लाच रक्कम स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.